# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १९१** **दिनांक १४/०७/२०२१**

## चोरी व घरफोडी करणारे २ सराईत गुन्हेगार गजाआड- विरार पोलीस स्टेशनची कामगिरी.

दिनांक २३/०६/२०२१ रोजी ०२:३० ते ०५:३० वाजेचे पुर्वी ऋषभ ब्रश बफिंग कंपनी, गणपती मंदीरा जवळ, चंदनसार रोड, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर येथुन अज्ञात आरोपितांनी संगणमत करुन फिर्यादी यांच्या गाळयाचे शटरचे लॉक तोडुन आत प्रवेश करुन ३५,०००/- रुपये किंमतीचे २.२५ इंच रुंदीचे १८०० लोखंडी सर्कल पार्ट, २.५० इंच रुंदीचे ४८० लोखंडी सर्कल पार्ट, ३ इंच रुंदीचे १००० लोखंडी सर्कल पार्ट, १५ वर्षापुर्वी खरेदी केलेले जु.वा.कि.सु. असा मुद्देमाल चोरी करुन नेला म्हणून फिर्यादी यंनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५५५/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३८०, ४६१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपींची गुन्हे करण्याची कार्यपध्दती व तांत्रिक बाबींच्या आधारे संशईत नामे १) सजन बबन काकडे वय २१ वर्षे रा- साई चाळ, देवकी निवास, कातकरी पाडा, चंदणसार रोड, विरार पुर्व २) सनी सुरेश सरोदे वय २१ वर्षे रा- साई जिवदानी चाळ, रुम नं ०३, पांडवास नगर, कातकरी पाडा, चंदणसार रोड विरार पुर्व हे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक ०३/०७/२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे.

आरोपी अटके दरम्यान करण्यात आलेल्या तांत्रीक तपासामध्ये नमुद गुन्ह्याव्यतिरीक्त खालील नमुद दाखल असलेल्या एकुण ०६ चोरीच्या गुन्ह्यातील ५७,५००/- रु. कि. माल आरोपींकडून हस्तगत करण्यात आला आहे.

| अ.क्र | तपशिल |
|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ५५५/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३८०,४६१,३४ |
| २ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ४७०/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३७९,४२७ |
| ३ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र १९३/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३७९ |
| ४ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ४३२/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३७९ |
| ५ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ९९६/२०२०, भा.दं.वि.सं कलम ३७९ |
| ६ | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ५२१/२०२१, भा.दं.वि.सं कलम ४५४,४५७,३८० |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-३, श्रीमती रेणुका बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली विरार पोलीस स्टेशनचे श्री. सुरेश वराडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोउपनि. अभिजीत भुपेंद्र टेलर, संदेश राणे, पो. हवा. सचिन लोखंडे, पोलीस नाईक विजय दुबळा, हर्षद चव्हाण, भुषण वाघमारे, संदिप शेरमाळे, पो. शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, सागर घुगरकर, पवन पवार यांनी केली आहे.

*********